जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2025
सकाळ



भगवान महावीर अध्यासनासाठी वसंतराव चौगुले ट्रस्टकडून धनादेश देताना.

# महावीर अध्यासनाच्या इमारतीकरिता चौगुले ट्रस्टकडून लाखाची देणगी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या नूतन इमारतीकरिता येथील श्री वसंतराव चौगुले ट्रस्टच्या वतीने एक लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

ट्रस्टचे अध्यक्ष सुभाष आण्णा चौगुले, उपाध्यक्ष अनिल चौगुले, सचिव अनिल पाटील (संचालक, केडीसीसी बँक) यांच्या हस्ते हा धनादेश कुलगुरुंकडे देण्यात आला. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अध्यासनाच्या सल्लागार समितीचे सदस्य सुरेंद्र जैन, एन. एन. पाटील, डॉ. मनोज पाटील, डी. ए. पाटील, ट्रस्टचे संचालक नितीन चौगुले, लक्ष्मीकांत चौगुले, सुमित चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2025

तरुण भारत

# यशासाठी आत्मविश्वास आवश्यक : प्र-कुलगुरू

कोल्हापूर : विद्यार्थींनीनी यशापर्यंत पोहोचण्यासाठी चिकाटी, सकारात्मक दृष्टिकोन, धैर्य आणि आत्मविश्वास हे गुण अंगी बाणवावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या 'होस्टेल डे' कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी हॉस्टेल डेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार यांनीही मार्गदर्शन केले. वसतिगृहाच्या मुख्य अधीक्षक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अधिक्षक डॉ. कविता वड्राळे यांनी अहवाल वाचन केले. यावेळी विद्यार्थिनींनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. मीना पोतदार यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. नीलांबरी जगताप यांच्यासह विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAR 2025
सकाळ

# गोखले महाविद्यालयात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २९ : गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात 'महाविद्यालयीन विकासात प्रशासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना न्यू कॉलेज क्लस्टरअंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

कार्यशाळेचे उद्‍घाटन चेअरमन डॉ. मंजिरी मोरे, प्राचार्य डॉ. आर. बी. भुयेकर, व प्रा. डॉ. आर. पी. आढाव यांच्या हस्ते झाले. प्रा. पी. पी. सुतार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. पहिल्या सत्रात सुहास भोसले यांनी विविध शासकीय शिष्यवृत्तीबद्दल माहिती दिली. दुसऱ्या सत्रात रवी भोसले यांनी कार्यालयातील विविध कामांचा आढावा घेतला. तिसऱ्या सत्रात प्रा. प्रमोद झावरे यांनी तानतणाव कमी करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी डी. ए. ढोले, एम. बी. बसुगडे, प्रा. आर. पी. जाधव व अन्य उपस्थित होते. उपक्रमास शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, प्रशासन अधिकारी पृथ्वी मोरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.